





दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 25 ■ मंगळवार, 14 एप्रिल 2026 ■ पाने 05 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com







# ४२८ ग्रामपंचायतींची प्रारूप प्रभाग रचना जाहीर; २१ एप्रिलला हरकतींवर सुनावणी

## ४ मे रोजी जाहीर होणाऱ्या अंतिम प्रभाग रचनेकडे लक्ष

## आरक्षण सोडत व निवडणूक कार्यक्रमाची गावपुढाऱ्यांना प्रतीक्षा

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव - धाराशिव जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने हालचालींना वेग दिला असून, जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तब्बल ४२८ ग्रामपंचायतींची प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली असून इच्छुक उमेदवारांसह स्थानिक नेते आणि ग्रामस्थांचे लक्ष आता अंतिम प्रभाग रचनेकडे लागले आहे. ग्रामपंचातींची मुदत संपून दोन महिने झाले असून, गावागावात राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे.**

प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना नोंदवण्यासाठी १३ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत नागरिक, राजकीय पक्ष, इच्छुक उमेदवार आणि ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. काही गावांमध्ये प्रभागांच्या सीमांबाबत, लोकसंख्येच्या असमतोलाबाबत तसेच वाड्या-वस्त्यांच्या समावेशाबाबत आक्षेप नोंदवले गेले आहेत. प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल रोजी सुनावणी होणार असून, त्यानंतर प्रशासनाकडून आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. सर्व हरकतींचा सखोल आढावा घेतल्यानंतर ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाणार आहे. जिल्ह्यातील संबंधित तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील मित्यांमार्फत तलाठी आणि ग्रामसेवकांनी गावनिहाय प्रभाग रचना तयार केली आहे. या प्रक्रियेत लोकसंख्या, भौगोलिक स्थिती, वाड्या-वस्त्या, रस्ते तसेच नैसर्गिक सीमा यांचा बारकाईने विचार करण्यात आला आहे. तयार आराखडा पुढील कार्यवाहीसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला होता. दरम्यान, अनेक ठिकाणी प्रभाग रचनेत मोठे बदल दिसून येत आहेत. काही गावांमध्ये नवीन प्रभाग निर्माण करण्यात आले असून, काही ठिकाणी जुन्या प्रभागांची पुनर्रचना करण्यात आली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पारंपरिक बालेकिल्ले मानल्या जाणाऱ्या भागांमध्ये नव्या प्रभाग रचनेमुळे स्पर्धा अधिक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर आरक्षण सोडत प्रक्रिया पार पडणार आहे. ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, त्यावरूनच अनेक इच्छुक उमेदवारांचे राजकीय भविष्य ठरणार आहे. आरक्षण निश्चित झाल्यानंतर लगेचच निवडणूक कार्यक्रम जाहीर होतो का याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. अंतिम प्रभाग रचना आणि आरक्षण प्रक्रियेनंतर राजकीय हालचालींना आणखी वेग येणार आहे.




### असा असेल पुढील कार्यक्रम

प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया पार पडली. आता २१ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांपुढे त्यावर सुनावणी होणार आहे. त्यानंतर २३ एप्रिल २०२६ रोजी अंतिम प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २८ एप्रिल २०२६ पर्यंत अंतिम प्रभाग रचना निश्चिती करून तो प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी सादर होणार आहे. दिनांक ४ मे रोजी आयुक्तांच्या मंजुरीनंतर अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### तालुकानिहाय निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतीची संख्या

| तालुका | | ग्रामपंचायत संख्या |
|---|---|---|
| धाराशिव | - | ६६ |
| तुळजापुर | - | ५३ |
| उमरगा | - | ४९ |
| लोहारा | - | २६ |
| कळंब | - | ५९ |
| वाशी | - | ३४ |
| भूम | - | ७१ |
| परंडा | - | ७० |
| एकूण | - | ४२८ |

### ग्रामपंचायत निवडणुका दिवाळीत होण्याची शक्यता

राज्यातील सुमारे १५ हजार आणि धाराशिव जिल्ह्यातील ४२८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका आता पावसाळ्यानंतर दिवाळीत पार पडण्याची शक्यता आहे. प्रभाग रचना, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित सुनावणी यामुळे ही निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. प्रभाग रचनेचे काम ४ मेपर्यंत पूर्ण होईल. परंतु अनेक जिल्ह्यात आरक्षणाचा गोंधळ सुरूच आहे. आरक्षणाच्या मर्यादेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून त्यावर जुलै महिन्यात सुनावणी होईल. त्यानंतर दोन ते अडीच महिने निवडणुकीसाठी लागणार आहेत. त्यामुळे या निवडणुका ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. यामधे दोन टप्पे करून काही निवडणुका ऑगस्ट महिन्यात देखील होऊ शकतात.

## धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता 1 ते 5 सेमी इंग्रजी करण्याचा निर्णय



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या मुख्याध्यापकांची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत तालुक्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत सेमी इंग्रजी माध्यम सुरू करण्याबाबत एकमताने ठराव घेण्यात आला. येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय अमलात आणण्याचे निश्चित करण्यात आले. बैठकीदरम्यान उपस्थित मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. शाळांमधील विविध अडचणी जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याबाबतही विचारमंथन झाले. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याच्या दृष्टीने सर्व विषयांवर सकारात्मक आणि सखोल चर्चा घडून आली. या बैठकीस धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम, उपसभापती प्रमोद पाटील, पंचायत समिती सदस्य प्रशांत रणदिवे, गटशिक्षणाधिकारी आसरा, तसेच सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि रविशंकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भोसले मॅडम उपस्थित होत्या. तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान अधिक सक्षमपणे मिळण्यास मदत होणार आहे.

## बेंबळी येथे किरकोळ वादातून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील बेंबळी येथे वाहन उभे करण्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाने मारहाणीचे रूप धारण केले असून, या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी बेंबळी येथे फिर्यादी सुधाकर माणिक भोजणे (वय ४४, रा. बेंबळी) यांच्या घरासमोरील रस्त्यावर चारचाकी वाहन व मोटरसायकल उभे केल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादातून आरोपी लहु दाणे व गणेश खंडु दाणे (दोघे रा. बेंबळी) यांनी फिर्यादीस शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी फिर्यादीची पत्नी व मुलगा मध्यस्थी करण्यासाठी आले असता, त्यांनाही आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच गल्लीत कसे राहता अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेप्रकरणी फिर्यादी सुधाकर भोजणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाकाली कला केंद्रात घुसून मारहाण करणाऱ्या जमावावर गुन्हा दाखल

आरंभ मराठी । येरमाळा

कळंब तालुक्यातील चोराखळी येथील महाकाली कला केंद्रात घरात घुसून तरुणासह कामगारावर जीवघेणा हल्ला करत लाखोंचा ऐवज लुटल्याची धक्कादायक घटना शनिवारी सायंकाळी घडली होती. या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास सुनिल शेळके, जयंत भोसले, नागेश लोखंडे, हनुमंत शेळके, योगेश चव्हाण, दिनेश चव्हाण, सोनु पवार तसेच अन्य सात अनोळखी इसम (सर्व रा. येडशी, ता. जि. धाराशिव) यांनी एकत्र येत गैरकायद्याची जमावबंदी करून महाकाली कला केंद्र, चोराखळी येथे प्रवेश केला. या वेळी फिर्यादी कशीश राजेश शेरकर (वय २०, रा. इंगळे गल्ली, धाराशिव; सध्या वास्तव्य महाकाली कला केंद्र, चोराखळी) यांना आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच तेथील कामगार महादेव पवार यांच्यावर कोयता व तलवारीने हल्ला करून गंभीर जखमी केले. आरोपींनी दोघांनाही जिवे मारण्याची धमकी दिली. हल्ल्यानंतर आरोपींनी रोख रक्कम २ लाख रुपये, सुमारे पाच तोळ्यांचे सोन्याचे लॉकेट, १२ ग्रॅम सोन्याची कानातील साखळी, तसेच टीव्ही, फ्रिज, एसी, कपाट, ७० खुर्च्या, ३ पाण्याच्या टाक्या, १० जार, ३ सीसीटीव्ही कॅमेरे व घरगुती साहित्य असा एकूण सुमारे ५ लाख १० हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला. याशिवाय वाहनाच्या काचा फोडून सुमारे ३ लाख रुपयांचे नुकसान केले.

## नाट्यगृहासाठी ५ कोटींचा निधी

### नगराध्यक्षा नेहाताई काकडे यांनी मानले उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार





**धाराशिव:-** शहरातील सांस्कृतिक चळवळीचे केंद्र असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या' दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५ कोटी रुपयांचा भरीव निधी जाहीर केला आहे. आपण आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या मागणीला आणि पाठपुराव्याला यश आले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरीव निधी मंजूर केल्याबद्दल नगराध्यक्षा सौ नेहाताई काकडे यांनी धाराशिव वासियांच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे धन्यवाद मानले आहेत. नगराध्यक्ष सौ. नेहा काकडे यांनी नुकतेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धाराशिव नगर परिषदेअंतर्गत विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे मागणी पत्र दिले होते. यामध्ये शहरातील रस्ते, कचरा व्यवस्थापन, उद्यान निर्मिती आणि नाट्यगृह दुरुस्ती यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या ९ कामांचा समावेश होता. या मागणीची दखल घेत, विशेषतः शहरातील कलावंत आणि रसिकांची सोय विचारात घेऊन, छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांचा निधी शिंदे यांनी तात्काळ जाहीर केला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उत्साह, आज विविध सामाजिक उपक्रमांनी जन्मोत्सव

**धाराशिव** :- विश्वरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज धाराशिव शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. यानिमित्त शहरात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सर्वत्र भीममय वातावरण निर्माण झाले आहे. जयंतीनिमित्त धाराशिव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले आहे. फुलांची सजावट, रोषणाई आणि आकर्षक विद्युत दिव्यांमुळे परिसर उजळून निघाला आहे. सकाळपासूनच नागरिक, विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. सायंकाळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून या मिरवणुकीत ढोल-ताशे, लेझीम पथक, बँड पथक तसेच विविध देखावे सादर करण्यात येणार आहेत. मिरवणुकीत हजारो भीमसैनिक सहभागी होणार असून 'जय भीम'च्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून जाणार आहे. यंदाच्या जयंतीनिमित्त काही ठिकाणी रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, गरजूंना अन्नदान, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच संविधान जागर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक ऐक्य आणि समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न या जयंतीतून करण्यात येणार आहे.

आरंभ मराठी — जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील व रूपाली कोरे यांच्या हस्ते महापूजा

# हरीनामाच्या निनादाने दुमदुमली तेर नगरी; संत गोरोबाकाका समाधी सोहळ्यात वैष्णवांचा मेळा









आरंभ मराठी । तेर

वैराग्य महामेरू संत गोरोबाकाका यांच्या ७१० व्या वार्षिक समाधी सोहळ्यास रविवारपासून प्रारंभ झाला असून प्रदक्षिणा मार्गावर सडा, रांगोळ्यांच्या पावित्र्यासह ज्ञानोबा-तुकारामांच्या निनादाने वातावरण भक्तिमय बनले आहे. यानिमित्ताने तेरणा तटावर वैष्णवांचा मोठा मेळा पाहावयास मिळत आहे.सोमवारी (दि.१३) एकादशीच्या दिवशी काकांच्या समाधीची महापूजा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, युवा नेते मल्हार पाटील, मंदिर ट्रस्टच्या प्रशासक रूपाली कोरे बारवडे, रचना कन्स्ट्रक्शन कंपनीचे दत्तात्रय मुळे व ऊषा मुळे यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीचे निरीक्षक अतुल नळणीकर, पद्माकर फंड, नवनाथ नाईकवाडी, ह.भ.प. रघुनंदन महाराज पुजारी, बंडू पुजारी, अजीत कदम, अमोल कस्तुरे, संजय कडाप्पा इंगळे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.संत गोरोबाकाका यांच्या पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी हरीनामाचा गजर करत नगरप्रदक्षिणा काढली. प्रत्येक फडावर दिवसभर प्रवचन, कीर्तन, भारूड, भजन आदी कार्यक्रमांची रेलचेल सुरू असून त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.यात्रेदरम्यान कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर व उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या नेतृत्वाखाली ढोकी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. मंदिर परिसरात सीसीटीव्हीची नजर ठेवण्यात आली असून ग्रामपंचायतीने यात्रा परिसरात मनोरे उभारून त्यावर कॅमेरे व एलईडी दिवे बसवले आहेत. भाविकांनी यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मंदिराच्या प्रशासक रूपाली कोरे बारवडे, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब खोचरे यांनी केले आहे. समाधी सोहळ्यानिमित्त मंदिर गाभाऱ्यात व परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

### पाणपोई व प्रसाद वाटप

आमदार राणाजगजितसिंह पाटील, रणसम्राट ग्रुप, रचना कन्स्ट्रक्शन कंपनी, तेरणा पब्लिक स्कूल, विजय कुलकर्णी परिवार तसेच विविध व्यक्ती व संस्थांच्या वतीने भाविकांना खिचडी, थंडपेय, केळी व पाणी वाटप करण्यात आले. सामाजिक संस्थांच्या वतीने पाणपोई उभारण्यात आल्या आहेत. सामाजिक दायित्व म्हणून व्यक्तींकडून आणि संस्थांकडून भाविकांना विविध उपक्रमातून सेवा दिली जात आहे.

### २५ बसद्वारे भाविकांची वाहतूक

धाराशिव-लातूर विभागाच्या वतीने जादा बसची व्यवस्था करण्यात आली असून, ज्येष्ठ नागरिक व महिलांचा मोठा प्रतिसाद दिसून येत आहे. धाराशिव, कळंब, लातूर, औसा आगारांतून भाविकांची ने-आण सुरू आहे. बसच्या फेऱ्या वाढल्यामुळे भाविकांची सोय झाली असून, खाजगी वाहनातूनही भाविक गर्दी करत आहेत.

### २४ तास आरोग्य सुविधा सज्ज

सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य प्रशासन सज्ज असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यात्रेच्या ठिकाणी डॉक्टर आणि नर्स तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी सेवा देत आहेत.

### धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

यात्रेत अमावास्येपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामधे दिनांक १५ एप्रिल रोजी गोरोबाकाकांची पुण्यतिथी आहे. १६ एप्रिल रोजी गोपाळकाला होऊन समाधी सोहळ्याची सांगता होईल, तर १९ एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या दिवशी यात्रा महोत्सवाची सांगता होणार आहे.

# नायक मूक समाजाचे अन् बहिष्कृत भारताचे



रामचंद्र भालचंद्र आरडले

## अशी बोलते कविता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत असताना त्यांच्या चळवळीतील एक सक्रिय कार्यकर्ते दलित पँथरचे सहसंस्थापक, तळागाळातील दलित समाजासाठी कार्य करणारे, बाबासाहेबांचा विचार पुढे घेऊन जाणारे एक कार्यकर्ते ज. वि. पवार यांची एक कविता आजच्या जयंतीनिमित्त रसग्रहण करण्यासाठी निवडली आहे.

**कवी : ज.वि. पवार**

जयराम विठ्ठल पवार (जन्म : १४ जुलै १९४३), ज. वि. पवार म्हणून प्रसिद्ध, हे दलित पँथरचे सहसंस्थापक, मराठी साहित्यिक, आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक, भाष्यकार व विचारवंत आहेत. पवार यांचा जन्म पिलवली (ता. चिपळूण) गावी झाला होता. दलित पँथरचे सहसंस्थापक. आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ कार्यकर्ते. 'दलित पँथर' आणि 'सम्यक क्रांती' या संघटनांचे प्रवर्तक चळवळीसंबंधी विविध वृत्तपत्रे,नियतकालिकांमध्ये लेखन.

कविता: तू निघालास तेंव्हा ...

तू निघालास तेंव्हा काळोखाचं राज्य होतं सुर्यफुलांनी पाठ फिरवली होती मळवाटेने जायचे नाकारलेस तेंव्हा खचखळग्यांनी तुझे स्वागत केले

तू निघालास तेंव्हा म्हणजे जेंव्हा तू दलित , शोषित समाजाच्या उद्गाराचे कार्य हाती घेतलंस, सुरुवात केलीस तेंव्हा सर्वत्र काळोख भरलेला होता. हा काळोख अन्यायाचा, दारिद्र्याचा, अवहेलनेचा, तुच्छतेने मिळणाऱ्या वागणुकीचा , गुलामगिरीचा काळोख होता. हे तू पाहिलंस, नुसतं पाहिलं नाही तर भोगलंस सुद्धा आणि म्हणूनच त्याची प्रखरतेने जाणीव झाली , चीड निर्माण झाली आणि तू पेटून उठलास ...सुर्यफुलांनी पाठ फिरवली होती याचे दोन अर्थ इथे निघतात. सुर्यफुले हे समृद्धीचे , सुखसमाधानाचे प्रतिक. दलित समाजाच्या वाट्याला कसलं आलंय सुख , समाधान. त्यांच्या जीवनात फक्त काटेच होते. टोचणारे अन बोचणारे. याचा दुसरा अर्थ असा की सूर्यफूले ही मार्गदर्शक, पथदर्शी असतात. तत्कालीन समाजाचे जे कुणी पथदर्शी नेते होते , ज्यांनी मार्ग दाखवायला हवा होता त्यांनी म्हणावे असे प्रयत्न केले नाहीत. केले असले तरी त्यांचा काही प्रभाव पडला नाही. कदाचित त्यातला फरक हा होता की ते सवर्ण होते, त्यांना अन्याय दिसत होता, कळत होता, त्यांना सहानुभूती वाटत होती पण हे जरी कितीही खरं असलं तरी त्यांनी ते स्वतः भोगलं नव्हतं. स्वतः दुःख भोगणं आणि दुसऱ्याचं दुःख जाणंण यात खूप मोठा फरक पडतो. जी कळ बाबासाहेबांना जाणवली ती कदाचित तत्कालीन पुढाऱ्यांना जाणवणे शक्यही नव्हते.

तू मळवाटेने जायचं नाकारलंस कारण त्या वाटेने जाणं म्हणजे तोच अन्याय अजून वर्षानुवर्षे मूकपणे सहन करत राहणं. जे चाललय ते तसंच सुरू ठेवणं. म्हणजे अन्याय होतोय हे कळून सुद्धा काहीच न बोलणं. हे तू नाकारलंस. तू वाट बदललीस, वेगळी वाट धरलीस ज्या वाटेवर फक्त खाचखळगे होते, अनंत अडचणी होत्या. ज्यांनी शतकानुशतके अन्याय



केला, पायाखाली चिरडलं त्यांना ही वेगळी वाट सहजासहजी कशी मान्य होणार होती ? ते तुझ्या मार्गात संकटं उभी करणारच, तुला अडवणार, दिशाभूल करणार , जे जे म्हणून करता येईल ते ते सर्व काही करणार. पण तू डगमगला नाहीस , तू पुढे पुढे चालतच राहिलास.

**तू झालास परिस्थितीवर स्वार आणि घडविलास नवा इतिहास**
**तू झालास मूक समाजाचा नायक आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करत कवी पुढे म्हणतात तू परिस्थितीवर स्वार झालास. म्हणजे त्यावर तू मात केलीस. जे होतं ते तू चालू दिलं नाही. जे असायला हवं ते साधण्याचा तू प्रयत्न केलास, ते तू घडवून आणलंस. आणि एक नवा इतिहास घडविलास. मानवी संस्कृतीच्या इतिहासात मानवतेला लागलेला कलंक मिटवलास, जिथे माणसांना माणूस समजण्यास नकार दिला होता ते तू हे बदललंस हा खूप मोठा इतिहास आहे. पुढे कवी म्हणतात की तू मूक समाजाचा नायक झालास . ज्यांनी अन्याय मूकपणे सहन केला. त्यालाच आपलं नशीब, प्रारब्ध समजलं, किंबहुना त्यांना तसंच भासवलं गेलं त्यामुळे ते बदलावं किंवा बदलू शकतं हेही लक्षात आलं नाही. अशा मूक समाजाचं तू नेतृत्व केलंस , तू आमचा नायक झालास, आमचा कैवारी झालास. उभा म्हणजे संपूर्ण बहिष्कृत भारत तू जागा केलास. या देशातील कितीतरी मोठा समाज सवर्णांनी कित्येक शतकांपासून बहिष्कृत केला होता, वाळीत टाकला होता. त्यांना अस्पृश्य ठरवलं होतं. सार्वजनिक रस्ते, पाणवठ्यावर जायला सुद्धा बंदी केली होती. असे एक नव्हे अनेक अन्याय होत होते त्या सगळ्यांना तू जागं केलंस. पेटून उठवलंस. अंगार फुलवलास.

**तू फुंकलेस रणशिंग ज्ञानाच्या बळावर तू तोडल्यास गुलामांच्या पायातील बेड्या**
**आणि उभे केलेस चवदार तळ्याच्या काठावर युद्धात जवानांना उभे करावे तसे**

या कडव्यातून बाबासाहेबांच्या लढ्याचं अचूक नेमक्या शब्दात वर्णन कवीने केलं आहे. तू जो लढा उभारलास तू पारंपरिक पद्धतीने नव्हे. म्हणजे यापूर्वीच्या इतिहासात जी युद्ध झाली ती शस्त्रास्त्रांच्या बळावर . पण तुझ्या युद्धाचं शस्त्र ते नव्हते . तू जे रणशिंग फुंकलस ते ज्ञानाच्या बळावर. तुझा विश्वास तुझ्या अगाध ज्ञानावर, विचारांवर, प्रखर बुद्धिमत्तेवर होता. तेच तुझं बळ होतं. त्यानेच गुलामांच्या पायातील बेड्या तोडण्याचं काम तू केलंस. कारण जोपर्यंत या बेडयांची जाणिवंच नव्हती तोवर हे नष्ट करणं शक्य नव्हतं. म्हणून बाबासाहेबांनी दलितांना जागृत केलं आणि आंदोलनात सहभागी करून घेतलं. त्यांनाच या लढ्याचे पाईक बनवले. इथे कवीने चवदार तळ्याच्या लढ्याचा उल्लेख केला आहे. चवदार तळ्याच्या काठावर तू आम्हाला असं उभं केलंस जणू युद्धात सैनिक उभे राहतात शत्रूसमोर. हे एक प्रकारे युद्धच होतं. या युद्धात पाण्यावर हक्क सांगणं एवढंच मर्यादित उद्देश नव्हता तर ते प्रतिक होतं सर्व प्रकारच्या अन्यायचं, असमानतेचं, अस्पृश्यता आणि बहिष्कार यांचं. या सगळ्यांविरुद्ध पुकारलेलं ते युद्ध होतं.

**तुझे शब्द असे की महाकाव्ये तुझ्या पायाजवळ गळून पडवीत**
**तुझा संघर्ष असा की काठ्यांच्या सांगिनी व्हाव्यात**

इथे कवी बाबासाहेबांच्या लढ्याचं यश प्रतिपादन करतात. तुझ्या या लढ्याची यशस्वीता ही आहे की महाकाव्ये सुद्धा गळून पडावीत. असं कवी म्हणतो याच कारण हे की आपल्या इतक्या महान मानल्या गेलेल्या महाकाव्यात सुद्धा दलित, अस्पृश्य, गुलाम ,पीडित समाजाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य नव्हते. तसे असते तर ही महाकाव्ये असतानाही हा अन्याय शतकानुशतके चालू का राहिला ? त्यांनी सवर्णांना ते करत असलेल्या अन्यायाची जाणीव का करून दिली नाही ? का त्यांना त्यातून योग्य वागणुकीचे मार्गदर्शन मिळाले नाही. का मग महाकाव्यांनीही हीच व्यवस्था घालून दिली. अन्यायाची , गुलामगिरीची. त्यामुळे कवी म्हणतात तुझ्या शब्दांनी ही क्रांती घडवली. अन्याय सहन करणाऱ्यांना आणि तो करणाऱ्यांनाही याची जाणीव करून देण्यात तुझे शब्द यशस्वी झाले. म्हणून महाकाव्यापेक्षा ते मोठे आहेत. या लढ्यात काठ्यांच्याच तलवारी बनल्या . वेगळी शस्त्रे या गोरगरीब लोकांकडे कुठून येणार ? जेंव्हा या अन्याया विरुद्ध आवाज उठवला गेला तेंव्हा सवर्णांनी त्यांच्यावर प्रतिहल्ले केले. तेंव्हा काठयांचेच शस्त्र बनले.

**तुझ्या डरकाळीने हादरले आकाश अन डचमळली पृथ्वी**
**अन बघता बघता चवदार तळ्याला आग लागली..**

चवदार तळ्याच्या सत्याग्रहात तू जी डरकाळी फोडलीस त्याने आकाश आणि पृथ्वी सुद्धा हादरली, कंपित झाली, बिथरली. वर्षानुवर्षे आलेली स्थितीशिलता गळून पडली. अन्यायाची जाणीव सर्वानाच झाली. एवढेच नव्हे तर चवदार तळेही पेटले. इथे तळे पेटले अशी विरोधाभासी शब्दचमत्कृती वापरली आहे. चवदार तळे पेटले अर्थात युगानुयुगे थंड पडलेला , अन्याय सहन करणारा दलित समाज आता पेटून उठला, जागृत झाला.आंबेडकर एका ठिकाणी म्हणतात गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो पेटून उठेल. आणि तेच इथे घडले.

**आज पन्नास वर्षांनी अनुभवतोय सुर्यफुलेही तुझा ध्यास घेतायत बिगुल प्रतीक्षा करतोय**
**चवदार तळ्याचं पाणी , तेही आता थंड झालंय**

अंतिम कडव्यातून कवी या कवितेचा सारांश मांडताना खूप काही सांगून जातात. आंबेडकरांच्या लढ्याचे यश सांगताना आज असलेली त्याची गरजही व्यक्त करतात. आंबेडकरी चळवळीला आलेली मरगळ आणि भरकटली दिशाही लक्षात आणून देतात. ते म्हणतात ज्या सूर्यफूलांनी तुझ्याकडे पाठ फिरवली होती ती आता तुझी वाट पाहत आहेत. तुझ्या स्वागतासाठी बिगुल वाजतो आहे. बिगुल रणांगणावर वाजत असतो. म्हणजे अजूनही बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले विचार पूर्णांशाने अमलात आले नाही. खरी समता निर्माण झाली नाही. सामाजिक, आर्थिक, राजकिय समानता खरच निर्माण झाली आहे का ? जातीअंत झाला का ? धर्मनिरपेक्षता आणि सहिष्णुता आमच्या मनात निर्माण झाली का ? न्याय, समता आणि बंधुता ही तळागाळातील नागरिकांत रुजली का ? सर्व प्रकारचे अन्याय बंद झाले का ? वरील सर्व प्रश्नांची उत्तरे जर नकारार्थी असतील तर मग चळवळीची गरज संपली का ? पुन्हा बाबासाहेब जन्म घेतील आणि क्रांती घडवून आणतील याची आम्ही वाट पाहणार आहोत का ? त्यांनी दिलेल्या विचारांनी आम्ही प्रेरित होत नाहीत का ? ते विचार आपल्याला पेटून उठण्याचे बळ देत नाहीत का ? अन्याय दिसूनही आपण मूकपणे का सहन करतो आजही ? चवदार तळे थंड झाले आहे असे कवी म्हणतो. म्हणजे अजून एक समतेची क्रांती व्हायलाच हवी. खरी समता निर्माण करण्यासाठी अजून प्रयत्न करायला हवेत. चळवळी बंद पडता काम नये. चवदार तळ्याच्या सत्याग्रहास 50 वर्षे पूर्ण झाल्याच्या घटनेच्या स्मरणार्थ लिहिलेली ही कविता आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करत असताना त्यांना आपण एका विशिष्ट समाजाचे न बनवता अखिल मानवतेचे ते हितरक्षक होते , त्यांचा समतेचा विचार सर्वव्यापी होता , तो रुजला पाहिजे हे ध्यानात घ्यावे. महामानवांचा पराभव त्यांचे अनुयायीच करतात असे डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लिहून ठेवले आहे. त्याची प्रचिती येत आहे मात्र हे थांबले पाहिजे. महामानव हे अखिल मानव समाजाचेच असतात याचे भान ठेवायला नको का ? त्यांचे विचार प्रवाही ठेवायला हवेत, ते साचेबंद ठेवले तर ते कालपरत्वे जुने, निरुपयोगी ठरू शकतात. हे त्या महापुरुषांनाही आवडणारे नाही. महापुरुषांना जातीजातीत विभागणे हे किती संकुचित वृत्तीचे काम आहे याची जाणीव यानिमित्ताने यायला हवे.

# ज्ञानाचा अथांग सागर



जगात स्त्री आणि पुरुष या दोनच जाती असून मानवता हा एकच धर्म आहे.' असे मानवतावादी विचार मांडणारे जागतिक कीर्तीचे पंडित आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी देश उभारणीत दिलेले योगदान फार मोठे आहे.डॉ. आंबेडकरांनी संविधानाची निर्मिती करुन देशाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम केले आहे. स्वातंत्र्य ,समता आणि बंधुता ही मूल्यांवर बाबासाहेबांचा गाढ विश्वास होता.त्यासाठी त्यांनी शेवटपर्यंत संघर्ष केला. अज्ञान हे सर्व समस्यांचे मूळ आहे. त्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही.हे बाबासाहेबांनी सगळ्यांना सांगितले. बाबासाहेबांनी अत्यंत खडतर परिस्थितीत आपल्या ज्ञानाची भूक भागविली. एका भाषणात बाबासाहेब म्हणतात 'मुंबईच्या डेव्हलपमेंट चाळीत दहा फूट लांब,दहा फूट रुंद अशा खोलीत बाप,भावंडे यांच्यासह राहून एका पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला आहे.इतकेच नव्हे तर अनेक अडचणींना व संकटांना त्या काळी तोंड देऊन मी जर एवढे करु शकलो,तर मग आज तुम्हाला अशक्य काहीच नाही. कोणताही मनुष्य सतत दिर्घोद्योगाने पराक्रमी व बुद्धिमान होऊ शकतो.कोणीही मनुष्य उपजत बुध्दीमान अगर पराक्रमी निपजू शकत नाही.' पुणे येथे ११-३-१९३८ रोजी विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना डॉ.आंबेडकरांनी हे विचार मांडले आहेत.बाबासाहेबांनी त्या काळी मांडलेले विचार आजही मौल्यवान आहेत याची प्रचिती येते. आज मुलांना सर्वसुखसोयी अथवा साधने उपलब्ध आहेत. परंतु शिक्षणात अपेक्षित प्रगती दिसून येत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे जाणीवेचा अभाव.माझ्या उन्नतीसाठी मला शिकलेच पाहिजे ही जाणीव मुलांमध्ये निर्माण होईल त्यावेळी समाजात अनेक विद्यार्थी आत्मविश्वासाच्या बळावर यशवंत किर्तीवंत झालेले पहावयास मिळतील. बाबासाहेब पुढे आपल्या भाषणात म्हणतात 'आत्मविश्वासारखी दुसरी दैवी शक्ती नाही.आम्ही आमच्यातील आत्मविश्वास गमावता कामा नये.मी जे करीन ते होईल.अर्थात हे सर्व मी आत्मविश्वासावर करत असतो.' बाबासाहेब विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा देतात. शिकण्याशिवाय पर्याय नाही हे समजावून देताना ते सांगतात .'विद्या हे असं एक धन आहे की त्याची चोरी कोणीही करु शकत नाही'. आजच्या मुलांनी शिक्षण घेत असताना बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला पाहिजे. कारण बाबासाहेब इंग्लडमध्ये असताना जो अभ्यासक्रम पूर्ण करण्यास आठ वर्षे लागतात तो अभ्यास त्यांनी दोन वर्षे तीन महिन्यात पूर्ण केला. यासाठी चोवीस तासातील एकवीस तास अभ्यास केला. त्यांची ज्ञानाची भूक इतकी प्रचंड होती की पोटाच्या भूकेचा त्यांना विसर पडत असे.यामुळेच जागतिक कीर्तीचे विद्वान पंडित म्हणून त्यांचा लौकिक आहे. विद्या विनयेन शोभते याबाबतीत बाबासाहेब पुढे म्हणतात 'माणसाने जन्मभर जरी शिकायचे मनात आणले तर विद्यासागराच्या कडेला असलेल्या गुडघाभर ज्ञानात फार झाले तर जाता येईल.'इतकं हे ज्ञान अफाट आहे.शिक्षणतज्ज्ञ म्हणून बाबासाहेबांचे विचार अत्यंत प्रभावशाली आहेत.शिक्षणाने माणसाच्या जीवनातील अंधःकार दूर होवून ज्ञानाचा प्रकाश येऊ शकतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता.परदेशात जाऊन बाबासाहेबांनी अनेक विद्याशाखांचा अभ्यास केला.विविध विषयावर संशोधन केले.अनेक पदव्या संपादन केल्या.एक वेळ तर अशी होती की बाबासाहेबांना पावाच्या तुकड्यावर दिवस काढावे लागत होते.तरी सुद्धा आपल्या शिक्षणापासून विचलित होण्याचा विचार त्यांच्या मनात कधीही आला नाही.बाबासाहेब खूप जिद्दी होते.मनात आलेली गोष्ट ते कितीही त्रास झाला तरी ते साध्य करत.बाबासाहेबांना पुस्तकांचे व वाचनाचे प्रचंड वेड होते.त्यांच्याइतका पुस्तकांवर जीवापाड प्रेम करणारा दुसरा माणूस नसेल.त्यांच्या ग्रंथालयात हजारो ग्रंथ होते.ख-या अर्थाने बाबासाहेब श्रीमंत होते. त्यांना पुस्तकांचा सहवास खूप प्रिय होता. आपल्याला ज्ञानी बनायचे असेल तर बाबासाहेबांसारखे पुस्तकात गुंतून घ्यावे लागेल.माणासाने जन्मभर जरी शिकायचे मनात आणले तरी विद्यासागराच्या कडेला असलेल्या गुडघाभर ज्ञानात फार झाले तर जाता येईल. ज्ञानाचे महत्त्व बाबासाहेब अशा प्रकारे सांगतात. आजच्या काळात ज्ञान हीच संपत्ती असल्याने प्रत्येक विद्यार्थ्यांने ज्ञानी बनण्यासाठी मनापासून प्रयत्न करायला हवेत.

लक्ष्मण जगताप
बारामती
लेखक शिक्षक आहेत.

# मानवी हक्कांचे लढाऊ पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

किशोर जाधव,
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१



कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करण्याचे ठरवले. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ५ जून १९५२ रोजी संपन्न झाला. या समारंभात डॉ. आंबेडकरांना "डॉक्टर ऑफ लॉज" ही पदवी देण्यात आली. त्यांना डॉक्टरेट प्रदान करताना त्यांचे वर्णन "घटनाकार, मंत्रिमंडळाचे व राज्यसभेचे सदस्य, भारतातील एक प्रमुख नागरिक, महान समाजसुधारक आणि मानवी हक्कांचा लढाऊ पुरस्कर्ता" असे करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण अमेरिका व इंग्लंडमध्ये झाले. तेथील सामाजिक रचनेसाठी झालेले लढे त्यांनी अभ्यासले होते. मानवी हक्कांचा आधार स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हा आहे, हे त्यांच्या लक्षात आले होते. भारतीय समाजात अस्पृश्यांचे मानवी हक्क चिरडले गेले आहेत, हे त्यांना पदोपदी जाणवत होते. बडोदा सरकारमध्ये नोकरी करताना त्यांना जाणवले की, हिंदू समाजात अस्पृश्य व्यक्ती कितीही उच्चशिक्षित असली तरी त्याला इतर जातींच्या अगदी निकृष्ट व्यक्तीपेक्षाही कनिष्ठ समजले जाते. बडोद्यात त्यांना राहण्यासाठी घर मिळत नव्हते, तसेच खानावळीत जेवणही दिले जात नव्हते. मिलिटरी सचिव असूनही कार्यालयातील कारकून व शिपाई त्यांच्याकडे दूरून फाईल फेकत असत. कार्यालयात त्यांना पाणीही मिळत नव्हते. इतकी अवहेलना एका उच्चशिक्षित व उच्चपदस्थ व्यक्तीला सहन करावी लागत होती; तर गावाबाहेरील अस्पृश्यांची अवस्था तर आणखीच दयनीय होती. 'मूकनायक' या पाक्षिकातील अग्रलेखात डॉ. आंबेडकरांनी प्रथम अस्पृश्यांना स्वातंत्र्य द्यावे, नंतर इतर




भारतीयांना द्यावे, अशी इंग्रज सरकारकडे मागणी केली. २१ मार्च १९२० रोजी माणगाव परिषदेत छत्रपती शाहू महाराज यांनी भारतातील अस्पृश्यांचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांकडे सोपवले. त्यानंतर डॉ. आंबेडकर स्वतःला आपल्या समाजाच्या हातातील काठी समजू लागले. त्यांच्या नेतृत्वामुळे अस्पृश्य समाज प्रगतीच्या मार्गावर चालू लागेल, असा विश्वास त्यांनी दिला. अस्पृश्यांच्या मानवी हक्कांची स्थापना करण्यासाठी सर्व जातींना समान पातळीवर आणणे आवश्यक आहे, असे त्यांनी ठामपणे मांडले. त्यासाठी 'समानते'चे तत्त्व स्वीकारताना मागासलेल्या घटकांना अधिक सवलती व प्रगत घटकांना कमी सवलती देण्याचे 'सकारात्मक भेदभावाचे' तत्त्व त्यांनी स्पष्ट केले.डॉ. आंबेडकरांनी एका बाजूला अस्पृश्य समाजात स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली, तर दुसऱ्या बाजूला वर्णव्यवस्थेच्या समर्थकांविरुद्ध संघर्ष उभारला. २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह हा मानवी हक्कांसाठीचा निर्णायक लढा ठरला. हा सत्याग्रह भारतीय मानवी हक्क चळवळीतील मैलाचा दगड ठरला. या सत्याग्रहाचे हे शताब्दी वर्ष आहे.'बहिष्कृत भारत' या मुखपत्राच्या २५ नोव्हेंबर १९२७ च्या अंकात त्यांनी सत्याग्रहाचा हेतू स्पष्ट करताना लिहिले की, अस्पृश्यांनी हीनतेतून बाहेर पडल्यास त्यांना आत्मस्वातंत्र्य प्राप्त होईल आणि ते आपल्या बुद्धी, पराक्रम व उद्योगाच्या जोरावर देशाच्या प्रगतीत योगदान देतील. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड परिषदेत त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मनुस्मृतीचे दहन करून विषमतेविरुद्ध आवाज उठवला. गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी सर्व भारतीयांना मताधिकार देण्याचा आग्रह धरला. मताधिकार म्हणजे स्वतःच्या जीवन, संपत्ती व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या कर्तव्यांची त्रिपुटी होती—प्रथम देश, नंतर अस्पृश्य समाज आणि त्यानंतर इतर समाज. पत्रकार बेव्हर्ल निकोल्स यांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, "मला खेडोपाडी विखुरलेल्या अस्पृश्यांना एकत्र करून त्यांना सक्षम बनवायचे आहे." उच्च शिक्षण, उच्च पदस्थ नोकऱ्या आणि सन्मानपूर्वक जीवन हा त्यांनी अस्पृश्यांच्या मानवी हक्कांचा पाया मानला. मजुरांच्या हक्कांबाबतही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. त्यांनी सांगितले की, जोपर्यंत प्रत्येक मजुराला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा हक्क मिळत नाही, तोपर्यंत स्वातंत्र्याचा खरा अर्थ पूर्ण होत नाही. १९४२ ते १९४६ या काळात मजूरमंत्री म्हणून त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. कामाचे तास १० वरून ८ केले, स्त्रियांसाठी प्रसूती रजा लागू केली, तसेच विविध कामगार कायदे आणले. भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अमूल्य योगदान दिले. २६ जानेवारी १९५० रोजी राजकीय समानता मिळेल; परंतु सामाजिक व आर्थिक विषमता कायम राहील, याची त्यांनी जाणीव करून दिली. ही विषमता दूर केली नाही, तर लोकशाही धोक्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री म्हणून त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी 'हिंदू कोड बिल' मांडले. परंतु त्यास पुरेसा पाठिंबा न मिळाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. आपल्या राजीनाम्यात त्यांनी स्पष्ट केले की, सामाजिक विषमता कायम ठेवून आर्थिक सुधारणा करणे म्हणजे संविधानाची चेष्टा होय.

# विद्यार्थ्यांनो, बाबासाहेबांचा आदर्श घ्या

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.



१४ एप्रिलला विश्वरत्न, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी अनेक देशांमध्ये, भारतात, भारतातील प्रत्येक शहरांत आणि सर्व गाव खेड्यांत अगदी मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती समता दिन व ज्ञान दिवस म्हणून साजरी केली जाते. काळाराम मंदिर सत्याग्रह, चवदार तळ्याच्या सत्याग्रह, मनुस्मृतीचे जाहीर दहन असे अनेक लढे त्यांनी लढले. मूकनायक, समता, बहिष्कृत भारत व प्रबुद्ध भारत ह्या वर्तमानपत्रांतून समाज प्रबोधन केले. केवळ शिक्षण आणि ज्ञानाच्या जोरावर भारताचे आदर्श असे संविधान लिहून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षे गुलामीत पिचलेल्या, उच्च वर्णियांकडून अन्याय अत्याचार, जातीयतेचे व विषमतेचे चटके सोसलेल्या गावकुसाबाहेरील जन समुदायाला गावातील आणि शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आणून माणसांत बसवले. कामगार, शेतकरी, मजूर, स्त्रिया आणि नोकरदार स्त्री व पुरुष यांना अनेक हक्क मिळवून दिले. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि आरक्षणाची कवचकुंडले देऊन मागासवर्गीयांच्या जीवनाचे सोने केले. म्हणून जयंतीच्या दिवशी सायंकाळी सगळे आंबेडकर अनुयायी, भीम सैनिक आणि बौद्ध धर्मीय बांधव मोठ्या अभिमानाने एकत्र येऊन बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढतात. काही भीमसैनिक भीम गितांवर मनसोक्त थिरकतात आणि नाचतात. बाबासाहेबांच्या जयघोषाने सारे वातावरण दुमदुमून जाते. जिकडे तिकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त उदात्त अंतःकरणाने विनम्र अभिवादन करण्याची लगबग सुरू असते. सगळे वातावरण प्रफुल्लित झालेले असते. मोठ्या अभिमानाने लहान थोर आंबेडकर अनुयायी बाबासाहेबांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात,त्यांच्या पुतळ्या समोर नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करतात.गावागावांत साजरे होणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दैदिप्यमान जयंती सोहळे पाहिले की मन गहिवरून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तीमत्वाचे व जीवन कार्यांचे



विविध पैलू आपण सर्व जण जाणतो. त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कृषी, उद्योग, धार्मिक, साहित्यिक, न्यायिक, सांस्कृतिक, सिंचन आणि नद्या जोड प्रकल्प अशा विविध क्षेत्रांतील अलौकीक कार्य समस्त भारतीय जनतेचा उध्दार करून गेले. अठरा अठरा तास अभ्यास करून त्यांनी अनेक उच्च कोटीच्या ३२ पदव्या मिळवल्या. यास्तव त्यांना सारे जग ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखते. शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगताना एका सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी तळमळीने भारतातील विद्यार्थ्यांना व तरूणांना 'विद्यार्थ्यांनो जागृत व्हा' असे उद्देशून सांगताना म्हटले होते की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी ते प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. शिक्षण अर्धवट सोडून आणि घरातील आर्थिक स्थिती बिकट असेल तर राजकारणात अजिबात येऊ नका. अगोदर उच्च शिक्षण शिका, आपल्या व आपल्या कुटुंबाच्या पोटा पाण्याची सोय करा. त्यानंतर मग समाजकारण करा आणि मगच निर्भिडपणे राजकारणात या. शासनकर्ती जमात बना. केवळ शिक्षणाच्या पदव्या मिळवू नका. तर त्या शिक्षणाचा उपयोग समाजातील अन्याय,अत्याचार दूर करण्यासाठी करा. केवळ शिक्षणानेच मनुष्याचा उध्दार होतो. शिक्षणाला विज्ञान, चारित्र्य आणि मानवतावादी विचारांची कृतीयुक्त जोड मिळाली की क्रांती घडवून येते. त्यासाठी आपणाला आपल्या इतिहासाची आठवण झाली पाहिजे तेव्हा नवीन मानवतावादी इतिहास घडवण्याची धमक निर्माण होते. डॉ.बाबासाहेबांचा हा संदेश समस्त विद्यार्थ्यांसाठी एक अनमोल ठेवा आहे. आजच्या घडीला हा संदेश सर्व विद्यार्थ्यांनी आत्मसात करायला हवा.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रिक्षा रॅली





**आरंभ मराठी । धाराशिव**

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी भीमजी ऑटो रिक्षा युनियन यांच्या वतीने शहरातून ऑटोरिक्षा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये 100 हून अधिक रिक्षा सहभागी झाले होते. शहरातील मध्यवर्ती बस स्थानकातून या रॅलीचा शुभारंभ नगरसेवक सिद्धार्थ शिंगाडे, विशाल शिंगाडे, राहुल काकडे,आरपीआयचे नेते राजाभाऊ ओव्हाळ, दत्ता पेठे, सुजित साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भीमजी ऑटोरिक्षा युनियनचे अध्यक्ष नागेश बनसोडे, उपाध्यक्ष बाळासाहेब बनसोडे कोषाध्यक्ष योगेश वाघमारे, सचिव अक्षय बनसोडे सहसचिव शीतल धावारे, मार्गदर्शक अरुण रणखांब, जमाल तांबोळी आदी पदाधिकारी उपस्थित होते. ही रॅली बसस्थानक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच ताजमहल टॉकीज चौक, देशपांडे स्टॅन्ड, माऊली चौक, काळा मारुती चौक, त्रिशरण चौक लेडीज क्लब मार्गे राजमाता जिजाऊ चौक, बार्शी नाका, माणिक चौक, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मार्गे पोलीस मुख्यालय, महात्मा ज्योतीबा फुले चौकात आल्यानंतर फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीचे विसर्जन करण्यात आले. या रॅलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह निळ्या ध्वजांनी रिक्षाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. बाळासाहेब रणखांब, अभिजीत शिंगाडे, राकेश जगताप, नामदेव मस्के, शिवाजी हुंबे, रणजीत माळाळे , रोहित बनसोडे, निशिकांत माळाळे , दुष्यंत बनसोडे आदींनी रॅली यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## विविध वृत्त

## पारा गावात महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



**आरंभ मराठी । पारा**

शिक्षणाचे प्रणेते व स्त्री शिक्षणाचे महान पुरस्कर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती पारा गावात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दिवसभर विविध ठिकाणी प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन झाले. सायंकाळी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. "शिक्षण हाच खरा विकासाचा मार्ग" या विचारांचा जागर करत गावातील मुख्य रस्त्यांवरून मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणूक पार पडली. या कार्यक्रमात पांडुरंग विधाते, बालाजी माळी, डॉ. मोहोळकर, लालासाहेब शेळके, दत्तात्रय ससाने, भीमराव माळी, मुन्ना माळी, अनिकेत जाधव, हरिभाऊ माळी, हनुमंत माळी, मारुती माळी, पोपट माळी, श्रीरंग बापू भराटे, महादेव तात्या लोकरे, महेश दादा खोले, बाळासाहेब मोहोळकर, राजेंद्र टाचतोडे, संदीप माळी, अनिल भराटे, शंकर माळी, विकास माळी, अमोल माळी, अंगद विधाते, विलास भराटे, सचिन बप्पा माळी, पंकज विधाते, दत्तात्रय शिनगारे, बळीराम शिनगारे, गणेश शिंदे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुगावमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत महिलांच्या हस्ते वृक्षारोपण



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील तुगाव येथे पंचायत राज योजनेअंतर्गत मारुती मंदिर परिसरात महिलांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धन व गाव हरित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात गावातील महिला भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रकारची रोपे लावली. तसेच लावलेल्या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्पही करण्यात आला. यावेळी महिलांनी समाजकार्यातील आपली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. "वृक्षारोपण म्हणजे केवळ झाड लावणे नव्हे, तर ते जगवणे आणि वाढवणे हीच खरी जबाबदारी आहे. प्रत्येकाने एक झाड लावावे आणि ते जपावे," असा संदेशही देण्यात आला. या उपक्रमामुळे तुगाव गावाच्या सौंदर्यात भर पडणार असून महिलांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण पाहायला मिळाले. ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या प्रसंगी मनीषा केंद्रे, अक्षता हाजगुडे, पोलीस पाटील श्रुतिका हाजगुडे, उमेद प्रभागसंघ व्यवस्थापक रूपाली शेंडगे, उमेद सीआरपी सुजाता मोरे, ग्रामसंघ सचिव स्वप्नाली हाजगुडे, उमेद पशु सखी रेणुका भुतेकर, मीना हाजगुडे, राजकन्या गोरे, लक्ष्मी थोरात, पूजा चौधरी, सुदामती शेंडगे व इतर महिला उपस्थित होत्या.

## पारा गावातील प्रलंबित समस्यांवर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**आरंभ मराठी । पारा**

पारा गावातील पाणी, वीज व सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी बाजीराव भराटे व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान शिबिरात तहसीलदार प्रकाश म्हेत्रे यांच्या मार्फत हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात साठवण तलावांच्या गळतीची दुरुस्ती, मांजरा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजे बसवणे, पारधी समाजातील कुटुंबांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देणे तसेच शेतकऱ्यांसाठी नियमित वीजपुरवठ्यासाठी मोठा ट्रान्सफॉर्मर बसवण्याच्या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## सारोळा ( मांडवा ) येथे भाजपाच्या नवीन शाखेचे उद्घाटन



**आरंभ मराठी । पारा**

वाशी तालुक्यातील सारोळा (मांडवा) येथे भारतीय जनता पक्षाच्या नव्या शाखेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुकाध्यक्ष राजगुरू कुकडे यांच्या नेतृत्वात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वाशी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष सुरेश कवडे यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन झाले. यावेळी पारा सर्कल प्रमुख महादेव तात्या लोकरे तसेच नगरसेवक राजू कवडे उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नव्याने स्थापन झालेल्या शाखेच्या अध्यक्षपदी दीपक संदिपान मोरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून उद्धव मुरलीधर नांगरे व विनायक भागवत डोईफोडे, चिटणीस दयानंद गणपती शिंदे, सरचिटणीस स्वप्निल कुलकर्णी व सुजित सुरेश मोरे यांची निवड झाली. कोषाध्यक्षपदी उद्धव माणिक राऊत, सहकोषाध्यक्ष म्हणून सतीश मोरे व संभाजी मोरे, तर सचिवपदी वसंत भानुदास शिंदे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

## सास्तुर पंचायत समिती मतदारसंघात 'महिला संवाद व ग्राम संवाद' उपक्रमाची चिंचोली रेबे येथे यशस्वी सांगता

**आरंभ मराठी । लोहारा**



सास्तुर पंचायत समिती मतदारसंघात राबविण्यात आलेल्या 'महिला संवाद व ग्राम संवाद' या नावीन्यपूर्ण उपक्रमाची सांगता चिंचोली रेबे येथे उत्साहात पार पडली. पंचायत समिती सास्तुर गणाच्या नूतन सदस्या सौ. प्रगती धीरज घोटाळे यांनी संपूर्ण मतदारसंघात गावभेट दौरा आयोजित करून थेट जनतेशी संवाद साधला. या दौऱ्यादरम्यान समाज मंदिर, गाव, वाडी-वस्ती तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी बैठका घेण्यात आल्या. नागरिकांच्या अडीअडचणी, समस्या आणि मागण्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्याची ग्वाही सौ. घोटाळे यांनी दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी ग्रामस्थांनी रेशन कार्ड, तहसील कार्यालयातील योजना, पानंद रस्ते, पाणीपुरवठा, बंदिस्त गटार, समाज मंदिर व स्मशानभूमी सुशोभीकरण, दिवाबत्ती, सोलर लाईट, अंगणवाडी सुधारणा, अंतर्गत रस्ते, बस स्टॅन्ड व बससेवा आदी विविध विकासकामांबाबत मागण्या मांडल्या. या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मतदारसंघात लवकरच वैयक्तिक लाभाच्या योजनांचे कॅम्प आयोजित करण्यात येतील तसेच विविध विकासकामांसाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरवठा करून ती पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन सौ. प्रगती घोटाळे यांनी दिले. या उपक्रमाची सांगता चिंचोली रेबे येथील विठ्ठल मंदिर व बुद्ध विहार येथे झाली. यावेळी सरपंच गोकुळ मोरे, ओमकार मोरे, नरेंद्र मोरे, दिलीप मोरे, बालेपीर शेख, भरत मोरे, विकास मोरे, पांडुरंग मोरे, प्रदीप पाटील, भालचंद्र मोरे, भागवत मोरे, विक्रम मोरे, कल्लापा कुरले, तानाजी मोरे, हरीदास मोरे, अंबादास देशमुख, सुभाष देशमुख, विशाल मोरे, अरुण बेदरे, भैय्यासाहेब माटे, गोविंद पाटील आदी उपस्थित होते

## बलसूर येथे महसूल समाधान शिबिर संपन्न; ६०० लाभार्थ्यांना लाभ

**आरंभ मराठी । उमरगा**



उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयात दिनांक १० एप्रिल रोजी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभाग, तहसील कार्यालय उमरगा यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे होते. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, तहसीलदार गोविंद येरमे, नायब तहसीलदार गजानन पारिस्कर, पंचायत समिती सदस्य अर्चना पाटील, मंडळ अधिकारी जगदीश लांडगे, सरपंच अश्विनी भोसले, दुय्यक निबंधक मंडलिक, सरपंच माधव जाधव, माजी सरपंच सुनीता पावशेरे, जयश्री नांगरे, उपसरपंच अयुब पटेल, तंटामुक्ती अध्यक्ष सतीश जाधव, प्राचार्य कवलजित बिराजदार, साहेबराव पाटील, रामलिंग बिराजदार, अंगद नागणे, प्राचार्य जे. एन. जाधव आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. बिराजदार यांनी शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरातून नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्याचा उद्देश असल्याचे सांगितले. आमदार स्वामी यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपविभागीय अधिकारी शेवाळे यांनी विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार गोविंद येरमे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. परमेश्वर सूर्यवंशी यांनी केले, तर आभार साहेबराव पाटील यांनी मानले. शिबिरादरम्यान विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या महसूल समाधान शिबिराचा सुमारे ६०० लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून उमरगा तहसीलचे कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भूम शहरात उष्णतेचा कहर; तापमानात उच्चांकी वाढ, सतर्कतेचा इशारा

**आरंभ मराठी । भूम**



भूम शहरासह परिसरात सध्या उन्हाचा तीव्र तडाखा वाढला असून नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. दिवसेंदिवस तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने दुपारच्या वेळेत शहरातील रस्ते ओस पडलेले दिसत आहेत. अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत असून सावलीचा आधार घेत उष्णतेपासून बचाव करत असल्याचे चित्र शहरभर दिसून येत आहे.शहरात मोठ्या प्रमाणावर सिमेंटची घरे तसेच रस्त्यांचे सिमेंटीकरण झाल्याने उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. सिमेंट दिवसभर साठवलेली उष्णता लवकर सोडत नसल्याने रात्रीसुद्धा उकाडा कायम राहत आहे. परिणामी नागरिकांना दिवसभरासोबतच रात्रीही अस्वस्थतेचा सामना करावा लागत असून घरात व बाहेर दोन्हीकडे तापमानाचा त्रास जाणवत आहे. उन्हाच्या कडाक्यामुळे शहरातील वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. बाजारपेठा, चौक आणि प्रमुख मार्गांवर दिवसभर शुकशुकाट जाणवत असून केवळ सकाळी व सायंकाळीच काही प्रमाणात नागरिकांची ये-जा दिसून येते. अनेकजण झाडांच्या सावलीत किंवा इमारतींच्या आडोशाला थांबून उष्णतेपासून दिलासा मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी पिणे, डोक्यावर टोपी किंवा कापड वापरणे, तसेच हलके व सैल कपडे परिधान करणे यासारख्या सूचना देण्यात आल्या आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदा पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवरही उष्णतेचा कडाका अधिक जाणवत असल्याने हवामानातील बदलाचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## आप्पासाहेब पाटील यांची जिल्हा परिषद स्थायी समितीत वर्णी आलूर गटामध्ये समाधान

**आरंभ मराठी । मुरुम**



उमरगा तालुक्यातील आलूर जिल्हा परिषद गटातून अपक्ष उमेदवार म्हणून विजय मिळवलेल्या आप्पासाहेब पाटील यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती निवड प्रक्रियेत सत्ताधारी गटाला दिलेल्या पाठिंब्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण आलूर गटात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुळचे कोथळी गावचे सुपुत्र असलेले आप्पासाहेब पाटील यांनी यापूर्वी सरपंच म्हणून प्रभावी नेतृत्वाची छाप पाडली आहे. स्थानिक विकासकामे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसामान्यांशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क यामुळे त्यांनी मतदारांचा विश्वास संपादन केला. याच विश्वासाच्या जोरावर मतदारांनी मोठ्या पक्षांच्या उमेदवारांना मागे टाकत त्यांना विजयी केले. निवडणुकीनंतर विविध राजकीय ऑफर समोर असूनही त्यांनी सत्ताधारी गटावर विश्वास दाखवत राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या भूमिकेची दखल घेत भाजपा युवा नेते मल्हार पाटील यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती निवडीनंतर त्यांची स्थायी समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. आप्पासाहेब पाटील यांच्या निवडीमुळे आलूर गटातील प्रलंबित प्रश्नांना गती मिळेल, तसेच विकासकामांना अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**आरंभ मराठी** — अणदूर-खुदावाडी मार्गाच्या दुरवस्थेमुळे ग्रामस्थांचे हाल

# साहेब, कधी होणार रस्ता?

**आरंभ मराठी । अणदूर**



गेल्या २० वर्षांपासून प्रतीक्षेत असलेला अणदूर ते खुदावाडी हा सुमारे ४ किमीचा महत्त्वाचा रस्ता सध्या खड्ड्यांनी पूर्णपणे व्यापलेला असून, वारंवार मागणी करूनही त्याची दुरुस्ती होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून केवळ आश्वासने मिळत असून, प्रत्यक्षात "तारीख पे तारीख" असा कारभार सुरू असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. हा रस्ता पुढे २ किमी अंतरावर नळदुर्ग-अक्कलकोट मुख्य मार्गाशी जोडला जातो. त्यामुळे अणदूरच्या खंडोबा मंदिराला तसेच अक्कलकोट येथील समर्थांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र सध्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट असून, सर्वत्र खड्डे व धुळीचे साम्राज्य पसरले आहे. अणदूर हे परिसरातील २५ ते ३० खेड्यांसाठी व्यावसायिक, शैक्षणिक, सामाजिक व आरोग्य सेवांचे केंद्र मानले जाते. विविध शाळा व महाविद्यालयांमुळे दररोज हजारो विद्यार्थी येथे ये-जा करतात. तसेच आरोग्य सुविधांसाठी अनेक रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची वर्दळ असते. ग्रामदैवत श्री खंडेरायाच्या यात्रा महोत्सवावेळी भाविकांची मोठी गर्दी होते. अणदूरमधील आण्णा चौकापासून खुदावाडीपर्यंतचा रस्ता विशेषतः धोकादायक बनला आहे. या रस्त्यालगत पूर्व प्राथमिक ते माध्यमिक स्तरावरील सुमारे पाच शाळा असून, लहान विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. रस्त्याची दुरवस्था, उडणारी धूळ आणि खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांसह रुग्ण व वयोवृद्धांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. याशिवाय परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस वाहतूकही याच मार्गाने होत असल्याने खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या सर्व समस्यांचा विचार करून अणदूर-खुदावाडी रस्त्याचे तातडीने डांबरीकरण व रुंदीकरण करावे, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## संत गोरोबाकाका समाधी सोहळ्यानिमित्त कुलकर्णी परिवाराकडून वारकऱ्यांना फराळ वाटप



**आरंभ मराठी । तेर**

वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यानिमित्त कुलकर्णी परिवाराच्या वतीने वारकऱ्यांसाठी फराळाचे वाटप करण्यात आले. बुकनवाडी रस्त्यालगत तसेच संत गोरोबाकाका मंदिराजवळील शेतात वारकऱ्यांना खिचडी व केळीचा प्रसाद देण्यात आला. या सेवाकार्यात विजय विनायकराव कुलकर्णी, राजेंद्र कुलकर्णी, श्रीरंग कुलकर्णी, अनिरुद्ध कुलकर्णी, अधीर कुलकर्णी, सुभाष कुलकर्णी, सुदाम जावळे, काका राऊत, नामदेव बंडे यांनी सहभाग घेतला. तसेच, उन्हापासून बचाव व्हावा म्हणून वारकऱ्यांसाठी आंबा व नारळ बागेत विश्रांतीची सोयही करण्यात आली होती. विजय कुलकर्णी हे गेल्या पाच वर्षांपासून वारकऱ्यांची सेवा करत असून त्यांच्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# 156 कोटींची कामे अर्धवट सोडणाऱ्या कंपनीलाच तुळजापूर विकास आराखड्यातील कामे देण्याचा घाट

## तुळजापुरात महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा पत्रकार परिषदेत आरोप

आरंभ मराठी । तुळजापूर

**तुळजापुरात आगामी होत असलेल्या तुळजाभवानी मंदिर परिसर व विकास आराखड्यामध्ये के. एच. कन्स्ट्रक्शन या कंपनीस 431 कोटींची कामे देण्याचा घाट घातला असून या कंपनीने यापूर्वी शहरातील नगरोत्थान योजनेअंतर्गत 156 कोटीची रस्ते कामे घेतली होती. मात्र ही रस्ते कामे अर्धवट टाकून ही कंपनी निघून गेली असून, पुन्हा त्याच कंपनीला कामे देण्यामागे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचा नेमका उद्देश्य काय आहे ? असा प्रश्न महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडून विचारण्यात आला आहे. तुळजापूर येथे महाविकास आघाडीने पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अनेक सवाल उपस्थित केले.**



यावेळी बोलताना शिवसेना उबाठा गटाचे नेते ऋषीकेश मगर यांनी सांगितले की, तुळजापूर येथे शहराच्या रस्त्याच्या कामासाठी नगरोत्थान योजनेअंतर्गत 156 कोटीचा निधी मंजूर करण्यात आला होता. या कामाची यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे होती. परंतु सत्ताधारी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून व त्यांच्यावर दबाव टाकून यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून आर्थिक माया कमवण्यात आली. विशेष म्हणजे या निधीमधून तुळजापूर शहरातील ज्या ठिकाणी लोकवस्ती आहे अशा ठिकाणी रस्त्याची कामे न करता जिथे लोकवस्ती नाही तसेच खाजगी विकासकाच्या प्लॉटिंगमध्ये ही कामे करण्यात आली आहेत. नगर विकास विभागाच्या नियमानुसार खाजगी विकासकाने स्वतः लाईट, नाली, रस्ते, ही कामे स्वतः करणे बंधनकारक असते. मात्र ही शासनाच्या निधीमधून कामे करण्यात आली असून शासकीय निधीचा गैरवापर करण्यात आला आहे. तर दुसरीकडे शहरातील रस्त्याची दुरावस्था असताना त्या रस्त्याची कामे या योजनेत घेण्याऐवजी ज्या ठिकाणी लोकवस्ती नाही त्या ठिकाणी ही कोट्यावधी रुपयांची कामे केली आहेत. तसेच मे. के. एच. कन्स्ट्रक्शन च्या ठेकेदारांनी निवेदा प्रक्रियेत

### आमदार राणा पाटील यांच्यावर आरोप

के. एच. कन्स्ट्रक्शन कंपनीस आगामी होत असलेल्या तुळजाभवानी मंदिर व परिसर विकास आराखड्यातील 436 कोटींची कामे देण्याचा घाट घालण्यात येत असून अर्धवट काम सोडून गेलेल्या कंपनीस परत ही काम कशी देण्यात येत आहेत. तसेच यामध्ये आमदारांचा काही विशेष लाभ आहे का ? असा प्रश्न यावेळी ऋषिकेश मगर यांनी विचारला आहे.

### कंत्राट मिळवण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर

156 कोटीच्या नगरोथ्यान रस्त्यांच्या कामांमध्ये तांत्रिक पात्रता सिद्ध करण्यासाठी के. एच. कन्स्ट्रक्शन यांनी सारा पात्र प्रकल्प या सदरात 46 पानांचे कागदपत्र सादर केले आहेत. त्यामध्ये सारा इंट्रॅफक्चर सोबत 162.85 कोटीचा कंत्राट असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र के एच कंट्रक्शन व सारा यांच्यामध्ये एक रुपयाचाही बँक व्यवहाराचा पुरावा नसल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

बनावट कागदपत्राच्या आधारे खोटी कागदपत्रे सादर करून राजकीय दबावातून पात्र नसतानाही ही निविदा मिळवली आहे. या बाबतीत त्यांनी सादर केलेली खोटी व बनावट कागदपत्रांचा पुरावाच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सादर केला. याबाबत आता शहरातील सामाजिक कार्यकर्ते, नागरिक तसेच इतर राजकीय कार्यकर्ते यांना घेऊन मुख्यमंत्री तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री यांची भेट घेऊन तक्रार करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे नेते ऋषिकेश मगर, गटनेते अमोल कुतवळ, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, किरण कदम, सुदर्शन वाघमारे, चिन्मय मगर आदी उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद व जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये एका क्लास वन अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पैसा तुळजापूर शहरात आला असल्याचा गंभीर आरोप देखील यावेळी रुषीकेश मगर यांनी केला. तसेच या पैशातूनच निवडणुका लढवून जिंकण्यात आल्या असून याबाबत लवकरच पुरावे देऊन पोलखोल करणार असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

# तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीला 'जीवन गौरव पुरस्कार'

## २५ वर्षांच्या लढ्याचा गौरव



आरंभ मराठी । तुळजापूर

सो ला पू र – तु ळ जा पू र – धा रा शि व रेल्वेमार्गासाठी तब्बल २५ वर्षे सातत्याने लढा देणाऱ्या तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. तसेच डॉ. पद्मसिंह पाटील सांस्कृतिक, क्रीडा व कला मंच, तुळजापूर यांनाही विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुणे येथील स्वारगेट परिसरातील सावित्रीबाई फुले सभागृहात दिनांक ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार सोहळा पार पडला. भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या नावाने दिला जाणारा महाराष्ट्र राज्यस्तरीय 'जीवन गौरव पुरस्कार' या वेळी प्रदान करण्यात आला. तुळजाभवानी तीर्थक्षेत्र तुळजापूर हे रेल्वे नकाशावर यावे आणि सोलापूर–तुळजापूर–धाराशिव रेल्वेमार्ग साकारावा, या मागणीसाठी २००६ पासून संघर्ष समितीच्या माध्यमातून विविध आंदोलने करण्यात आली. या सातत्यपूर्ण लढ्याची दखल घेत संघर्ष समितीच्या सर्व कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनराव गावडे, उपाध्यक्ष विकास तांबे, सल्लागार अशोकराव साळुंके, अंबादासराव पोफळे, कोषाध्यक्ष रत्नाकर खोले, रोऊफ शेख, छायाचित्रकार सतीश पवार, कोंडीबा प्रताप, दयानंद पांचाळ, अनिल हंगरगेकर, मोहन भोसले, खयूम शेख, अनमोल साळुंखे, गोविंद दिवटे, राहुल मलकूनाईक गवळी, तानाजी पाटील, शुभम खोले आदी संघर्ष योद्ध्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व गोल्ड मेडल देऊन गौरविण्यात आले. कर आयुक्त डॉ. सचिन मोटे, सहायक पोलिस आयुक्त रुक्मिणीबाई गलांडे, उपायुक्त तुकाराम शिंदे, ए. डी. फाउंडेशन (जत, सांगली) चे अध्यक्ष अशोक गोरड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे, तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीला यापूर्वी 'महाराष्ट्र गौरव २०२५' पुरस्कार तसेच 'क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२६' (अहिल्यानगर) देऊनही सन्मानित करण्यात आले आहे. कार्यक्रमास अनिता गावडे, सरोजा पांचाळ, सौ. तांबे, विवेक तांबे यांच्यासह कुटुंबीय व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# सहकारातून समृद्धीचा गौरव; यशदा परिवारावर कौतुकाची थाप





छत्रपती संभाजीनगर । आरंभ मराठी

सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा सन्मान करत सकाळ वृत्तपत्र समूह संचलित "सहकार परिषद आणि सहकारातून समृद्धी" या कॉफी टेबल बुकचा प्रकाशन सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत यशदा मल्टीस्टेटच्या प्रतिनिधींना विशेष सन्मान देण्यात आला.यावेळी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल सिंगी आणि सहकार भारतीचे महामंत्री श्री. विवेक जुगादे यांच्या हस्ते यशदा मल्टीस्टेटचे प्रतिनिधी श्री. रवि देशमुखे आणि श्री. तोफीक पटेल यांचा गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे यशदा परिवाराच्या कार्याची व्यापक दखल घेतली गेली.प्रकाशित करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकमध्ये यशदाचे सर्वेसर्वा प्रा. सुधीर (दादा) सस्ते यांच्या सहकार क्षेत्रातील योगदानावर सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याचा ठसा आणि सहकार चळवळीतील योगदान अधोरेखित करण्यात आले आहे.या सन्मानामुळे यशदा परिवाराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, सहकार क्षेत्रात त्यांच्या कार्याबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भाजप नेते अ‍ॅड. अनिल काळे यांच्या मातोश्री सुभद्राबाई काळे यांचे निधन



**काटी:-** भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. अनिल काळे यांच्या मातोश्री सुभद्राबाई सुखदेव काळे (वय ८० वर्षे) यांचे सोमवार, 13 रोजी दुपारी 4 वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी केमवाडी येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात 4 मुले,1 मुलगी ,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# मोरडा येथे २५ एकरांवर बेकायदेशीर वृक्षतोड; चौकशीची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील मौजे मोरडा शिवारातील सामाजिक वनीकरण विभागाच्या अखत्यारितील फॉरेस्ट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. अंदाजे २० ते २५ एकर क्षेत्रामध्ये ही वृक्षतोड सुरू असून त्यामुळे पर्यावरणीय हानीची भीती व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वृक्षतोड कोणत्याही अधिकृत आदेशाशिवाय केली जात असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, या कामासाठी नियुक्त गुत्तेदाराकडेही कोणताही वैध परवाना किंवा शासकीय आदेश उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हा प्रकार पूर्णपणे नियमबाह्य असून शासनाच्या नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत शेतकरी सेनेचे तुळजापूर तालुकाप्रमुख गणेश नेपते यांनी धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित गुत्तेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या बेकायदेशीर वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी (सामाजिक वनीकरण विभाग) तसेच वनक्षेत्रपाल यांना माहितीस्तव देण्यात आली आहे. यावेळी तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव, शहाजी हाक्के, नितीन मस्के, संभाजी नेपते, अंकुश पाटील, स्वप्निल सुरवसे, बाळू भैय्ये आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक समता सप्ताहानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाराशिव** :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष, संत गाडगे महाराज जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहानिमित्त जिल्हाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम, शिबिरे आणि विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने सोमवारी (दि.१३) सामाजिक न्याय भवन सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या रक्तदान शिबिरात सहायक आयुक्त समाज कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी, तसेच विविध महामंडळातील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये जितेंद्र डोंगरे, राहूल पेंढारकर, विवेक गायकवाड, श्रीकृष्ण मोटे, सिद्धार्थ ओव्हाळ, कृष्णा गायकवाड, संदीप पाटील, अक्षय गंगावणे, लक्ष्मण क्षिरसागर, भगवंत कपाळे, आदटराव लक्ष्मण, रतनराव भोसले आदींनी रक्तदान केले. या कार्यक्रमास सहायक आयुक्त समाज कल्याण सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने आदी उपस्थित होते.

# धाराशिव पंचायत समितीच्या वतीने 'जनता दरबारा'चे आयोजन

## १५ ते ३० एप्रिलदरम्यान गणनिहाय बैठकांचे नियोजन

आरंभ मराठी । धाराशिव

पंचायत समिती धाराशिव अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी तसेच नागरिकांच्या तक्रारी व समस्या थेट ऐकण्यासाठी 'जनता दरबार' बैठकींचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठका सभापती व उपसभापती यांच्या अध्यक्षतेखाली १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विविध गावांमध्ये पार पडणार आहेत. या उपक्रमांतर्गत दररोज सकाळी ९ वाजता संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात बैठका होणार असून, नागरिकांना त्यांच्या अडचणी, समस्या आणि सूचना थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच, ग्रामविकासाशी संबंधित प्रलंबित कामांचा आढावाही घेण्यात येणार आहे.

सभापती यांच्या जनता दरबाराचे वेळापत्रकानुसार कोंड, उपळा (मा.), पळसप, वाघोली, ढोकी, आळणी, येडशी, इर्ला, तेर, जागजी, कसबे तडवळे आणि गोवर्धनवाडी या गावांमध्ये बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. तर उपसभापती यांच्या जनता दरबाराचे आयोजन पाडोळी, शिंगोली, चिखली, वडगाव (सि), बेंबळी, चिलवडी, रुईभर, अंबेजवळगा, समुद्रवाणी, सांजा, करंजखेडा आणि केशेगाव या गावांमध्ये करण्यात आले आहे. या बैठकींसाठी संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पंचायत समिती प्रशासनाच्या या उपक्रमामुळे गावपातळीवरील समस्या तातडीने सोडविण्यास मदत होणार असून, नागरिक व प्रशासन यांच्यात थेट संवाद प्रस्थापित होणार आहे. त्यामुळे या जनता दरबार उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आरंभ मराठी | नाट्यगृहाच्या आधुनिकीकरणासाठी ५ कोटींचा निधी मंजूर

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पाळला

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या आधुनिकीकरणासाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. रविवारी (दि.१२) झालेल्या कार्यक्रमात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या धाराशिव शाखेकडून छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी अडीच कोटी रुपयांची मागणी केली होती. एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात अडीच कोटी नाही तर पाच कोटी रुपये मंजूर करतो असे सांगितले होते. त्यानुसार अवघ्या २४ तासांत शासन निर्णय जाहीर झाल्याने धाराशिवकरांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या निधीतून धाराशिव शहरातील छत्रपती



शिवाजी महाराज नाट्यगृह परिसरातील विविध विकासकामांना गती मिळणार असून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील. शहराचा सांस्कृतिक व नागरी विकास लक्षात घेऊन ही कामे राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी ९० टक्के निधी राज्य शासनाकडून, तर १० टक्के निधी नगरपरिषदेकडून उचलला जाणार आहे. सर्व कामे पारदर्शक पद्धतीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येतील. तसेच, तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनंतरच कामांची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पुढे सांगितले की, कामांची गुणवत्ता अबाधित राहावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांवर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक टप्प्यावर देखरेख व लेखापरीक्षण करण्यात येणार असून, कामांची छायाचित्रे, प्रगती अहवाल आणि निधीचा वापर यावर काटेकोर नियंत्रण ठेवले जाईल. तसेच पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या कामांशी समन्वय साधूनच रस्ते व इतर पायाभूत सुविधा विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून अनावश्यक खोदकाम टाळले जाईल व निधीचा अपव्यय होणार नाही. दरम्यान, धाराशिव दौऱ्यादरम्यान बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. रखडलेल्या पाणी प्रकल्पांना गती देऊन जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात आहेत. मराठवाड्यातील वॉटर ग्रिड प्रकल्पाला वेग देत दुष्काळमुक्तीच्या दिशेने निर्णायक पाऊल उचलले जात आहे. या माध्यमातून धाराशिवसह परिसरातील नागरिकांना दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित केला जाईल. राज्य सरकारच्या निर्णयक्षमतेमुळे विविध प्रलंबित विकासकामांना गती मिळत असून, जिल्ह्यातील रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांच्या कामांना प्राधान्याने मंजुरी देण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

# एक महिन्यात दहा गदा जिंकणाऱ्या पैलवान महादेव घोडके यांचा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या हस्ते सत्कार

## दरमहा लागणारा खुराक देण्याची घोषणा



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील रहिवासी व तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत असलेले पैलवान महादेव सुभाषराव घोडके यांनी कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याचा व जिल्ह्याची मान उंचावली आहे.पैलवान महादेव घोडके यांनी अवघ्या एका महिन्यात तब्बल १० गदा जिंकण्याचा भीम पराक्रम गाजवला आहे. त्यांनी तुळजापूर तालुक्यातील अंणदुर, शहापूर, आरळी, खुदावाडी, शिंदफळ तसेच जिल्ह्यातील विविध ठिकाणी आणि कर्नाटक राज्यातील अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय विजय संपादन केला.या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा नगराध्यक्ष विनोद गंगणे, माजी सभापती विजय गंगणे यांच्या हस्ते सन्मान व रोख रक्कम 11000 हजार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना दरमहा लागणारा खुराक देण्याची घोषणा करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीचे कौतुक केले व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पैलवान महादेव घोडके यांच्या या यशामुळे तुळजापूर तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून, युवकांना प्रेरणा मिळत आहे. यावेळी जयकुमार पांढरे , संग्राम पाटील, गणेश भिंगारे, मनोज गवळी, गटनेते औदुंबर कदम तसेच नगरसेविका प्रियंकाताई विजय गंगणे आदी उपस्थित होते.


## अवकाळी पावसाचा फटका; तरीही कैऱ्यांची बाजारात आवक वाढली

### मोहोर गळाल्याने उत्पादन घटण्याची शक्यता; उरलेल्या कैऱ्यांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

बालाजी मुळे / आरंभ मराठी

मुरूड -

यंदाच्या हंगामात आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहोर आला होता. सुरुवातीला हवामान अनुकूल असल्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठ्या उत्पादनाची आशा निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी झाडे मोहोराने भरून गेली होती, त्यामुळे यंदा विक्रमी उत्पादन होईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र, मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळे आ

## धाराशिवमध्ये ६२२ महिला उद्योजिकांची दमदार झेप, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने जिल्ह्याची वाटचाल

आरंभ मराठी / धाराशिव

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील महिलांनी उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय भरारी घेत नवा इतिहास घडविला आहे. पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करत १०१५ मंजूर प्रकल्पांपैकी तब्बल ६२२ प्रकल्प महिला उद्योजिकांनी साकारले असून, जिल्ह्यात 'नारीशक्ती'ची ठळक छाप उमटली आहे. राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे सुशिक्षित बेरोजगार महिला व युवकांना उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य मिळत आहे. यामुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी मिळत असून, त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासोबतच कुटुंबाच्या उत्पन्नातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी विविध उद्योगांत सक्रिय सहभाग नोंदविला

नांदुरीत शाळेचा सांस्कृतिक जल्लोष; स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे रंगतदार सादरीकरण

–

धाराशिव; तुळजापूर तालुक्यातील नांदुरी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन
का
अ
सर
नान
गाडे
उपा




सीएसआर अंतर्गत बालाजी अमाईन्सकडून तामलवाडी शाळेला रंगकाम

आरंभ मराठी / तामलवाडी

बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर ( कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी ) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील
त्साहात
बोलकी

